# मरोळ भुयारी मार्गात मेट्रो ३ ची चाचणी

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महत्त्वाची मेट्रो मार्गिका असलेल्या कुलाबा ते सीप्झसाठीच्या मेट्रो रेल्वे डब्यांची चाचणी मरोळ मरोशीतील भुयारी मार्गात करण्यात येणार आहे. या चाचणीमुळे हा मेट्रो प्रकल्प



दृष्टिपथात आला आहे. राज्य सरकारने स्थगिती दिलेल्या आरेतील त्या जागेच्या हद्दीबाहेरच ही चाचणी करण्यात येणार असून आरेतील एकाही वृक्षाला धक्का न लागू देता मेट्रोच्या चाचण्या पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. सध्या मरोळ मरोशी या रस्त्याच्या भुयारी मार्गाचे काम चालू असून या कामाच्या जवळच रॅम्प बनवून मेट्रो चाचणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या चाचणीच्या कामासाठी कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही. मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी कुलाबा ते सीप्झ या मार्गावर मेट्रो लाईन-३ चे काम प्रगतीपथावर आहे. या मार्गिकेसाठी अल्स्टॉम या कंपनीने

---

*तातुरती सेवा उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या परवानगीमुळे प्रकल्पास अधिक चालना मिळेल. सद्यस्थितीत प्रकल्पाचे ९८ टक्के भुयारी व जवळपास ७० टक्के स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत. पहिल्या नमुना ट्रेनच्या चाचणीस सुरुवात करून आम्ही आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठणार आहोत. तात्पुरत्या सुविधा उभारण्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असून, जवळपास अडीच महिन्यात हे काम पूर्ण होईल. ट्रेन मुंबईत दाखल होताच चाचण्यांना सुरुवात होईल, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंग देओल यांनी सांगितले.*

---

श्रीसिटी आंध्र प्रदेश येथे ८ डब्यांची ट्रेन तयार केलेली आहे. या गाडीची त्या ठिकाणी तांत्रिक चाचणी झाली आहे. आता प्रत्यक्षात याची चाचणी मुंबईत घेण्यात येणार आहे. त्यानंतर कुलाबा ते सीप्झ या मार्गिकेवरही ट्रेन चालवण्यात येणार आहे. या चाचण्या यशस्वी झाल्यानंतर अशा पद्धतीच्या ३१ ट्रेन या मार्गावर धावण्यासाठी उपलब्ध होणार आहेत.